आकाशवाणी मुंबई
प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता
१६ जुलै २०२६ - गुरुवार

**ठळक बातम्या**

- संसदेच्या पावसाळी अधिवेशनातली रणनीती आखण्यासाठी भाजपा आणि काँग्रेसच्या बैठका
- हायड्रोजनवर चालणारी देशातली पहिली रेल्वे गाडी उद्यापासून सुरू होणार
- डिझेल आणि विमान इंधनांवरच्या निर्यात शुल्कात वाढ
- वयोवृद्ध आणि दुर्धर रोगाने आजारी कैद्यांची मुदतपूर्व सुटका करण्यासंदर्भात सर्वसमावेशक धोरण आखण्याचे सर्वोच्च न्यायालयाचे निर्देश

**आणि**

- आशियाई मुष्टियुद्ध स्पर्धेत भारतीय महिला मुष्टियोद्ध्यांनी केली तीन सुवर्ण आणि १० रौप्य पदकांची कमाई

**<><><><><>**

येत्या सोमवारपासून संसदेचं पावसाळी अधिवेशन सुरु होत असल्याच्या पार्श्वभूमीवर प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नवी दिल्लीतल्या निवासस्थानी भाजपाच्या महत्त्वाच्या नेत्यांची बैठक काल झाली. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह, भाजपा अध्यक्ष नितीन नवीन यांच्यासह अनेक महत्त्वाचे नेते बैठकीला उपस्थित होते. यापूर्वी अशा चार बैठका झाल्या असून त्यातल्या एका बैठकीला राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेही उपस्थित होते.

पावसाळी अधिवेशनादरम्यान विरोधकांकडून उपस्थित होण्याची शक्यता असलेल्या मुद्द्यांवर, सरकारच्या विविध विभागातल्या समन्वयावर तसंच केंद्रीय मंत्रिमंडळातल्या बदलाच्या शक्यतेवर, आगामी विधानसभा निवडणुकीतल्या रणनीतीवर आणि भाजपा संघटनाबद्दल या बैठकीत निर्णायक चर्चा झाल्याचं सूत्रांच्या हवाल्याने वृत्तसंस्थेनं म्हटलं आहे.

संसद अधिवेशनाच्या पार्श्वभूमीवर रणनीतीवर चर्चा करण्यासाठी काँग्रेस संसदीय पक्षाची बैठक आज नवी दिल्लीत पक्षाध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांच्या निवासस्थानी झाली. लोकसभेतले विरोधी पक्षनेते राहुल गांधी आणि इतर पदाधिकारी बैठकीला उपस्थित होते.

**<><><><><>**

हायड्रोजनवर चालणाऱ्या देशातली पहिली रेल्वे गाडी उद्यापासून सुरू होणार आहे. हरयाणात जिंद रेल्वे स्थानकावर उद्या प्रधानमंत्री नरेंद्र मोदी या गाडीला हिरवा झेंडा दाखवून रवाना करतील. हायड्रोजन फ्युएल सेल या तंत्रज्ञानावर आधारित ही रेल्वे गाडी जिंद आणि सोनीपत स्थानकांदरम्यान धावेल. या तंत्रज्ञानात हायड्रोजनचं विजेत रुपांतर करून त्यावर गाडी चालते. परिणामी धुराऐवजी पाण्याची वाफ बाहेर पडत असल्यानं कार्बन उत्सर्जन शून्य होतं. ही रेल्वे गाडी संपूर्णपणे स्वदेश निर्मित आहे. 'ग्रीन हायड्रोजन'च्या वापरामुळे जीवाश्म इंधनावर आधारित औष्णिक ऊर्जा प्रकल्पांमधून निर्माण होणाऱ्या विजेवरचं अवलंबित्व कमी व्हायला मदत होणार आहे.

<><><><><>

केंद्र सरकारने डिझेल आणि विमान इंधनांवरच्या निर्यात शुल्कात वाढ केली असून, आजपासून हे नवे दर लागू झाले. सुधारित दरांनुसार डिझेलवर प्रति लिटर साडे १५ रुपये, तर विमान इंधनावर प्रति लिटर साडे १४ रुपये निर्यात शुल्क लागू होईल. पेट्रोलवरील निर्यात शुल्कात मात्र प्रति लिटर अडीच रुपये कपात करण्यात आली आहे.

इंधनावरच्या उत्पादन शुल्कात कोणतेही बदल झालेले नाहीत. पश्चिम आशियातल्या संघर्षाच्या पार्श्वभूमीवर देशात इंधनाची उपलब्धता नियमित राखण्याच्या दृष्टीनं गेल्या २७ मे पासून इंधनावरच्या विविध शुल्कांचा आढावा दर १५ दिवसांनी घेतला जातो.

<><><><><>

देशभरातल्या १२० नवीन ठिकाणांशी संपर्क व्यवस्था सुधारणं आणि पुढच्या १० वर्षांत चार कोटी प्रवाशांना प्रवासाची सुविधा उपलब्ध करून देणं हे उडान योजनेच्या पुढच्या टप्प्याचं उद्दिष्ट असल्याचं नागरी उड्डाण मंत्री किंजरापू राम मोहन नायडू आज म्हणाले. नवी दिल्ली इथे उडानच्या पुढच्या टप्प्याबाबत आयोजित एका कार्यशाळेत ते बोलत होते. सरकारने या टप्प्यासाठी २९ हजार कोटी रुपयांची तरतूद यापूर्वीच केली असून, पुढील दशकात आणखी १०० विमानतळ आणि २०० हेलिपोर्ट्स विकसित करण्याचं उद्दिष्ट ठेवल्याचं ते म्हणाले. या सुधारित योजनेमुळे आर्थिक व्यवहार्यतेतली तफावत भरून काढण्यासाठीची अनुदान पात्रता विस्तारल्याचं ते म्हणाले. या अंतर्गत विमान कंपन्यांना मिळणाऱ्या मदतीचा कालावधी तीन वर्षांवरून पाच वर्षांपर्यंत वाढवण्यात आला आहे आणि

निवडक टू टियर आणि थ्री टियर विमानतळांसाठी परिचालन आणि देखभाल सहाय्य सुरू करण्यात आल्याचंही नायडू म्हणाले.

<><><><><>

मुसळधार पावसामुळे प्रभावित झालेल्या कोकण विभागातल्या मतदार नोंदणीचं काम ठरवून दिलेल्या मुदतीत पूर्ण करण्याचे निर्देश निवडणूक आयोगानं दिले आहेत. मतदारयाद्यांच्या विशेष संक्षिप्त पुनरिक्षण अर्थात एसआयआर मोहिमेच्या प्रगतीचा केंद्रीय निवडणूक आयोगानं काल मुंबईत आढावा घेतला. त्यावेळी हे आदेश दिले. आता प्रत्यक्ष घरोघरी जाऊन पडताळणी आणि संगणकीकरणाचं काम पूर्ण करण्यासाठी केवळ दोन आठवडे उरले आहेत, असं आयोगानं सांगितलं. हे काम वेळेत पूर्ण करण्यासाठी मतदान बीएलओ अर्थात मतदान केंद्रस्तरीय अधिकाऱ्यांच्या मदतीला अतिरिक्त मनुष्यबळ तैनात करावं आणि त्यांना आवश्यक ते प्रशिक्षण द्यावं, अशा सूचना आयोगानं दिल्या.

राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी एस. चोक्कलिंगम आणि जिल्हा निवडणूक अधिकारी आणि महानगरपालिका आयुक्त अश्विनी भिडे या बैठकीला उपस्थित होते.

<><><><><>

बालकांच्या लसीकरणाच्या क्षेत्रात भारताने आणखी एक महत्त्वाचा टप्पा गाठला आहे. जागतिक आरोग्य संघटना आणि युनिसेफ यांच्या ताज्या अहवालानुसार, भारतात जन्मानंतर पहिल्या वर्षात एकही प्रतिबंधात्मक लस न मिळालेल्या बालकांची संख्या लक्षणीयरीत्या घटली आहे. २०२४ मध्ये लसीकरणापासून वंचित राहिलेल्या बालकांची संख्या सुमारे ९ लाख होती, २०२५ मध्ये ही संख्या घटून सहा लाख ७९ हजार इतकी झाली. देशातल्या ९५ टक्के बालकांचं संपूर्ण लसीकरण पूर्ण झालं आहे.

<><><><><>

वयोवृद्ध आणि दुर्धर रोगाने आजारी कैद्यांची मुदतपूर्व सुटका करण्यासंदर्भात सर्वसमावेशक धरण आखण्याचे निर्देश सर्वोच्च न्यायालयाने सर्व राज्य सरकारं आणि केंद्रशासित प्रदेशांच्या प्रशासनाला दिले आहेत. हे धोरण निश्चित करुन येत्या तीन महिन्यात देशभरात समान व्यवस्था लागू करावी असं न्यायालयाने सांगितलं आहे. न्यायमूर्ती विक्रम नाथ आणि न्यायमूर्ती संदीप महेता यांच्या पीठानं एका जनहित याचिकेवर हा आदेश देताना नवीन कार्यपद्धती इ प्रिझन्स पोर्टलवर उपलब्ध करुन द्यावी, असंही सांगितलं आहे.

<><><><><>

सीबीएसई अर्थात केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाच्या अभ्यासक्रमात नवव्या इयत्तेत त्रिभाषा धोरण लागू करण्याविषयी आज सर्वोच्च न्यायालयाने चिंता व्यक्त केली. तमिळनाडूमध्ये प्रत्येक जिल्ह्यात जवाहर नवोदय विद्यालय सुरू करण्याबाबत मद्रास उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशाविरुद्ध तमिळनाडू सरकारने दाखल केलेल्या याचिकेवर सुनावणी करताना न्यायालयाने हे निरीक्षण नोंदवलं आहे. यामुळे विद्यार्थ्यांवर ताण वाढण्याची शक्यता असून विद्यार्थ्यांना या बदलाशी जुळवून घेता यावं यासाठी इयत्ता पाचवी किंवा सहावीपासून त्रिभाषा सूत्र लागू करावं अशी सूचनाही सर्वोच्च न्यायालयाने केली आहे.

<><><><><>

रेल्वे मंत्रालयानं IRCTC च्या वेबसाइटची सोपी आणि सुलभ आवृत्ती वापरकर्त्यांच्या चाचणीसाठी सादर केली आहे. www.irctc.co.in/eticket/train-search या लिंकवरुन ही नवीन वेबसाइट वापरता येईल. या वेबसाइटवरुन तिकीट आरक्षित करताना सर्व श्रेणीतल्या उपलब्ध तिकिटांची माहिती एकाचवेळी इथं उपलब्ध होते, जलद आणि कमी टप्प्यात तिकिट आरक्षित करता येतं. या वेबसाइटवर प्रवाशांची माहिती साठवून ठेवण्याचा पर्याय उपलब्ध आहे. याशिवाय या वेबसाइटवर अनावश्यक कॅप्चा विचारले जात नाहीत, जाहिराती किंवा इतर व्यवधान येत नाहीत, असं रेल्वे मंत्रालयानं म्हटलं आहे.

<><><><><>

जकार्ता इथं सुरू असलेल्या आशियाई मुष्टियुद्ध स्पर्धेत भारतीय महिला मुष्टियोद्ध्यांनी शानदार कामगिरी करत तीन सुवर्ण आणि १० रौप्य पदकांची कमाई केली. १९ वर्षाखालील ५१ किलो वजनी गटात भारताच्या चंद्रीका पुजारीनं आणि प्राचीनं सुवर्णपदक जिंकलं. याच गटात गुंजन, जॉयश्री, चाहत, अंशिका, मेघा श्योकंद आणि प्राची तोकस यांना रौप्य पदकं मिळाली. दुसरीकडे २३ वर्षांखालील ५४ किलो वजनी गटात भारताच्या निशा हिने जपानच्या कोरिन कोकोफूचा ५-० असा एकतर्फी पराभव करत सुवर्णपदक मिळवलं. या गटात नितिका चंद, काजल, मुस्कान आणि प्रियांका यांना रौप्य पदकं मिळाली.

<><><><><>

फिफा फूटबॉल विश्वचषक स्पर्धेत काल अर्जेंटिनाने इंग्लंडचा दोन विरुद्ध एक असा पराभव करून अंतिम फेरी गाठली. आता अंतिम सामना अर्जेंटिना आणि स्पेन यांच्यात येत्या रविवारी १९ जुलै रोजी होईल.

<><><><>

यवतमाळ जिल्ह्यात कृषी निविष्ठांच्या गुणवत्तेवर नियंत्रण ठेवण्यासाठी प्रशासनाकडून कारवाई सुरू असून १५१ कृषी केंद्रांना विक्री बंद करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. जिल्ह्यात सोयाबीन बियाण्यासंदर्भात ८३२ तक्रारी दाखल झाल्यानंतर जिल्हा प्रशासनाने तपासणी सुरू केली. या कारवाईत जिल्ह्यातल्या ३८ केंद्रांचे परवाने निलंबित करण्यात आले असून १५ परवाने कायमस्वरुपी रद्द करण्यात आले आहेत तर ८ प्रकरणांमध्ये फौजदारी गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

<><><><>

पालघर जिल्ह्यातल्या अर्नाळा समुद्रकिनाऱ्यावर आंघोळीसाठी उतरलेल्या चार मुलांपैकी तीन जणं पाण्याच्या प्रवाहान वाहून गेलेत. यापैकी एका मुलाला वाचवण्यात यश आलं असून दोन मुलांचा शोध अद्याप सुरू आहे. अर्नाळा सागरी पोलीस, जीवरक्षक,आपत्ती व्यवस्थापन पथक आणि स्थानिक मच्छीमारांच्या मदतीने ही शोधमोहीम राबवण्यात येत आहे.

रायगड जिल्ह्यातल्या काळ नदी पात्रातील बेटावर फिरायला गेले◌ेली दोन जणं पूरपरिस्थिती निर्माण झाल्याने अडकून पडले होते. त्यांना पोलीस आणि आपत्ती व्यवस्थापन पथकाने केलेल्या त्वरीत कारवाईत वाचवण्यात आलं.

//<><><><>//